International Year of Cooperatives
Cooperatives Build a Better World

महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/पिग्मी एजंट/कमिशन/सुधारीत/१६१४ /२०२६ दिनांक :- १८ जून, २०२६

## परिपत्रकीय सुचना

**विषय :- सुधारीत आदर्श उपविधीतील नियम क्र.८(ब) मधील अल्पबचत प्रतिनिधीचे कमिशनबाबत**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठीचे सुधारीत आदर्श उपविधी दि.२९/०७/२०२५
२. या कार्यालयाचे परिपत्रकीय सुचना दि.३०/०३/२०२६
३. शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि.२०/०५/२०२६
४. या कार्यालयात आयोजित केलेली राज्यातील पतसंस्था फेडरेशनची बैठक दि.१२/०६/२०२६

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

या कार्यालयाचे दि.३०/०३/२०२६ चे परिपत्रकीय सुचनांद्वारे राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी निर्देश देण्यात आले की, सहकार आयुक्तालयाचे दि.२९/०७/२०२५ चे पत्रानुसार राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारले असो किंवा नसो, "पिग्मी एजंट यांच्यामार्फत गोळा करण्यात येणाऱ्या ठेवी संदर्भात त्यांना देय कमिशन २.५% पेक्षा अधिक असणार नाही. तसेच पिग्मी एजंट यांच्यामार्फत कर्ज वितरण, कर्ज वसूली अथवा अन्य व्यवसाय करता येतील. तथापि, त्यासाठी कोणतेही कमिशन देय असणार नाही."

याबाबत राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, पतसंस्थांचे फेडरेशन, अल्पबचत प्रतिनिधी यांनी या कार्यालयाकडे निवेदने सादर केली. त्यानुसार सदर विषयाबाबत चर्चा करण्यासाठी दि.१२/०६/२०२६ रोजी राज्यातील ४२ पतसंस्था फेडरेशनचे प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीतील चर्चेनुसार, राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी खालीलप्रमाणे सुधारीत निर्देश देण्यात येत आहेत.

"सहकार आयुक्तालयाचे दि.२९/०७/२०२५ चे पत्रानुसार राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारले असो किंवा नसो, अल्पबचत प्रतिनिधींमार्फत गोळा करण्यात येणाऱ्या ठेवी संदर्भात त्यांना देण्यात येणाऱ्या कमिशनची कमाल मर्यादा ३% असेल."

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी उपरोक्त कमाल मर्यादा आणि खालील अटी व शर्तीचे अधिन राहून अल्पबचत प्रतिनिधींचे कमिशनबाबत त्यांचे स्तरावरुन निर्णय घ्यावयाचा आहे.

१. संस्थेने त्यांचे आर्थिक स्थितीचा विचार करुन त्यांचे स्तरावरुन कमाल ३% मर्यादेचे अधिन राहून कमिशनचा दर ठरविण्यात यावा.
२. अल्पबचत प्रतिनिधींचे कमिशनबाबत अभ्यासपूर्वक निर्णय घेण्यात यावा जेणेकरुन संस्थेस तोटा होणार नाही.
३. अल्पबचत प्रतिनिधींना द्यावयाच्या कमिशनचा समावेश प्रशासकीय खर्चामध्ये करण्यात यावा.

४. नियामक मंडळाचे दि.१०/०५/२०१९ चे निर्देशाद्वारे आस्थापना व प्रशासकीय खर्च हा संस्थेच्या खेळते भांडवलाच्या २% पेक्षा अधिक असणार नाही, असे निश्चित केलेले आहे. सदर मर्यादेचे अथवा नियामक मंडळ आस्थापना व प्रशासकीय खर्चाबाबत वेळोवेळी जी मर्यादा निश्चित करील अशा मर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. अल्पबचत प्रतिनिधींमार्फत कर्ज वितरण, कर्ज वसूली अथवा अन्य व्यवसाय करता येतील. तथापि, त्यासाठी त्यांना कोणतेही कमिशन देय असणार नाही.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५(२) मधील स्पष्टीकरण एक मधील 'कुटुंब' व्याखेनुसार पतसंस्थेचे विद्यमान संचालक व त्यांचे नातेवाईक यांची पतसंस्थेसाठी अल्पबचत प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येणार नाही.

७. अल्पबचत प्रतिनिधींना कमिशन व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आर्थिक लाभ देता येणार नाही.

८. अल्पबचत प्रतिनिधींशी सर्वसमावेशक लेखी करारनामा करणे बंधनकारक राहील.

सदर सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था हया महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम, १९६१ मधील संबंधित तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

सदर सुचनांनुसार कार्यवाही झाली किंवा नाही, याबाबत संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी आपल्या लेखापरिक्षण अहवालात उचित ठिकाणी स्पष्ट अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे. सदरनुसार कार्यवाही न करणारे संबंधित वैधानिक लेखापरिक्षक हे उचित वैधानिक कारवाईस पात्र राहतील.

या विषयावरील पूर्वीच्या सर्व सूचना अधिक्रमित करण्यात येत असून, त्या आधारे सुरू असलेली कोणतीही प्रशासकीय वा कायदेशीर कार्यवाही जुन्या तरतुदींनुसारच सुरू राहील.

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, (सर्व)

यांनी सदरच्या सूचना आपले कार्यक्षेत्रातील सर्व नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था व सहकार विभागाच्या नामतालिकेवरील सर्व लेखापरीक्षकांच्या निर्दशनास आणुन देण्याची कार्यवाही करावी.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, (सर्व)
३. अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व पतसंस्था फेडरेशन) (राज्य/विभाग/ जिल्हा/ तालुके)

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२.